# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- १७११/२०२६

**अपिलार्थी, श्री.महेश पांडुरंग भोईर,**
संत रोहिदास वाडा, जोकर प्लाझा जवळ,
कल्याण (प), जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, | प्रथम अपिलीय प्राधिकारी, बांधकाम विभाग, |
| ३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली | ३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली |
| महानगरपालिका कल्याण, स्वामी दामोदरचार्य हॉल, | महानगरपालिका कल्याण, स्वामी दामोदरचार्य हॉल, |
| पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.), | पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.), |
| ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१. | ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१. |

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०९.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०९.२०२५ | -- | १२.११.२०२५ | १७.०२.२०२६ |

अपिलार्थी यांनी दि. ०४.०५.२०२६ रोजीच्या अर्जान्वये *"अपूर्ण माहिती मिळाली"* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत संत रोहिदास वाडा येथील विकासकामाची माहिती मिळणेबाबत.*

*संत रोहिदास वाडा कल्याण (प.) वार्ड क्र.३५ येथील झालेल्या विकास कामाची पूर्ण कागदोपत्री छायांकित प्रत मिळणेबाबत.*

*१) प्रस्तावित कामे, २) पूर्ण झालेली कामे, ३) कामाचा आदेश, ४) खर्चाचे देय, ५) निविदा, ६) प्रशासकिय मान्यता, ७)कोणत्या निधी अंतर्गत कामे, ८) काम निहाय निधीचा तपशिल मिळणेबाबत. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी *"अपुरी माहिती प्राप्त झाली"* असे कारण नमूद करुन दि.१२.११.२०२५ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७.०२.२०२६ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत.

*"जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवर अपीलकार यांचे समाधान झाले नसून आणखीन माहिती अपेक्षिलेली आहे. अपिलकारास ६० कामापैकी आपणास आवश्यक Specific कामाची मागील ४-५ वर्षामधील यादी द्यावी. त्याची संपूर्ण उपलब्ध माहिती अपिलकाराने अर्ज केल्यानंतर १५ दिवसात नि:शुल्क माहिती पुरविण्यात यावी.*

*सबब वरीलप्रमाणे निर्णय देवून अपील निकाली काढण्यात येत आहे."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झालेली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच अपिलार्थी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये मागीतलेली संपूर्ण माहिती विनामुल्य पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई :४०० ६१४.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६ .